वरिष्ठ पोलीस निरीक्षक डोंबिवली पोलीस ठाणे, राजाजीपथ,डोंबिवली रेल्वे स्टेशन जवळ,
डोंबिवली पुर्व. दुरध्वनी:—०२५१—२८६०१००/२८६०१०
ई—मेल:— thane.dombiwali@mahapolice.gov.in

प्रेस नोट दिनांक ०९/०९/२०२५

चैन स्नॅचिंग (जबरी चोरी) करणाऱ्या अंतरराज्य टोळीचा डोंबिवली पोलीसांनी केला पर्दाफाश

दिनांक ०३/०९/२०२५ रोजी दुपारी ०४:३० वा. चे सुमारास चांमुण्डा सोसायटी गेट जवळ, ९० फिट रोड, ठाकुर्ली डोंबिवली पूर्व येथुन वृध्द महिला पायी चालत जात असताना मोटार सायकलवर दोन इसम येवून वृध्द महिला हिचे गळयातील चैन खेचुन पळून घेवून गेले. त्याबाबत डोंबिवली पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ६८१/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३०९ (६), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील दाखल गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून मा.पोलीस उप आयुक्त सो. श्री.अतुल झेंडे, व सहा.पोलीस आयुक्त सो. श्री.सुहास हेमाडे यांनी केलेल्या सुचनांप्रमाणे मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. गणेश जवादवाड यांनी आरोपीचा छडा लावण्यासाठी व शोधे घेणेकामी डोंबिवली पोलीस ठाण्याचे शोध पथकांतील सहा.पो.निरी./मुपडे व पो.उ.निरी./चव्हाण यांच्या दोन टिम तयार करुन वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली नमुद गुन्हयाचे तपासादरम्यान घटनास्थळाचे व इतर ठिकाणाचे एकूण १०६ सी.सी. टि.व्ही.कॅमेराची पाहणी केली असता आरोपी यांने गुन्हयात वापरलेली मोटारसायकल क्र एमएच/ २०/ एफआर/ १८५१ ही असल्याचे निष्पन्न झाले त्याप्रमाणे मोटार सायकल मालकास संपर्क केला असता त्यांने सांगितले की, सदर मोटार सायकल त्यांने दिनांक २२/०८/२०२५ रोजी नारायण पेठ पुणे येथे पार्क केली असुन सदर ठिकाणाहुन चोरी गेली असुन त्याबाबत विश्रामबाग पोलीस स्टेशन पुणे शहर येथे गुन्हा नोंद आहे. यावरून समजले की, दाखल गुन्हयातील आरोपी यांनी सदर मोटार सायकल चोरी करून डोंबिवली येथे येवुन चैन स्नॅचिंग केली आहे. त्याअनुषंगाने सदर आरोपी यांचा गुन्हा केले ठिकाणाचा माग घेवुन त्यांचे बाबत अधिक माहिती प्राप्त केली. तपासदरम्यान तपास पथकानी अथक परिश्रम घेवून सदर आरोपी हे सुनिल नगर, डोंबिवली पूर्व येथे येणार असल्याचे पोलीस उपनिरीक्षक चव्हाण यांना माहिती मिळाली. प्राप्त माहितीचे अनुषंगाने सदर ठिकाणी सापाळा लावुन सदर संशयीत इसमांना ताब्यात घेतले. त्यांना त्यांचे नावे विचारता त्यांनी त्यांची नावे

१) अभय सुनिल गुप्ता, वय — २१ वर्षे, राह. कुमारनटोला, खुटार रोड, गोला गोकर्णनाथ, ठाणा — गोला गोकर्णनाथ, जि. लखीमपुर खिरी, उत्तरप्रदेश,

२) अभिषेक ओमप्रकाश जौहरी, वय — ३२ वर्षे, राह. रूम नं. १४/१५, हरीहरगंज, ठाणा — कोतवाली, फतेहपुर, जि. फतेहपुर, उत्तरप्रदेश,

३) अर्पीत उर्फ प्रशांत अवधेश शुक्ला, वय — २७ वर्षे, राह. खमरीया, ठाणा खेरी, जि. लखीमपुर खिरी, उत्तरप्रदेश

अशी सांगितले त्यांची अंगझडती घेता **अभय सुनिल गुप्ता, यांचेकडे १ गावठी रिल्हालव्हर** व **अभिषेक ओमप्रकाश जौहरी, याचेकडे ४ जिवंत काडतूस मिळुन आले.** तसेच त्यांचे अंगझडतीमध्ये सोन्याचे दागिने मिळून आल्याने त्याबाबत अधिक चौकशी करता सदरचे मुद्देमाल हा डोंबिवली व मानपाडा पोलीस ठाणे येथे दाखल गुन्हयातील असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच सदची मोटार सायकल ही चोरीची असल्याने त्याबाबत विश्रामबाग पोलीस ठाणे पुणे, येथे गुन्हा दाखल असल्याची माहीती प्राप्त झाली आहे. आरोपी यांचेकडे १ गावठी कट्टा व ४ जिवंत काडतूस मिळून आल्याने त्यांचेवर डोंबिवली पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ६८४/२०२५ आर्म ॲक्ट कलम ३(२५) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. येणे प्रमाणे वरिल आरोपीकडुन पुढील प्रमाणे मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

१) ३०,००० /— रू. किंमतीचा एक देशी बनावटीचा गावटी कट्टा
२) ८,००० /— रू. किंमतीची, गावठी बनावटीची ०४ जिवंत काडतुसे,
३) ३७,२६०/— रू. किंमतीची, एक सोन्याची लगड, ४.१४ ग्रॅम वजनाची,
(डोंबीवली पोलीस ठाणे गुरनं. ६८१/२०२५ भारतीय न्याय संहिता क. ३०९ (६), ३ (५))
४) २,१५,०१०/— रू. किंमतीचे, एक सोन्याचे मंगळसुत्र, २३.८९ ग्रॅम
(मानपाडा पोलीस ठाणे गुरनं १०५५/२०२५ भारतीय न्याय संहिता क. ३०९ (४), ३ (५))
५) ९०,०००/— रू. किंमतीची,यामाहा कंपनीची एफ झेड मॉडेलची नंबर MH20FR1851
(विश्रामबाग पो.स्टे., पुणे गुरनं १९९/२०२५ भारतीय न्याय संहिता क. ३०३ (२))
३,८०,४२० /— रुपये एकूण

तसेच सदर इसमांकडे वरिल प्रमाणे मुददेमाल मिळुन आला असुन पुढील गुन्हे उघकीस आले आहेत.

जिल्हा ठाणे

१) **डोंबीवली पोलीस ठाणे गुरनं. ६८१/२०२५ भारतीय न्याय संहिता क. ३०९ (६), ३(५) मधील,** एक सोन्याची लगड, ४.१४ ग्रॅम वजनाची, किं.सु.
२) **मानपाडा पोलीस ठाणे गुरनं १०५५/२०२५ भारतीय न्याय संहिता क. ३०९ (४), ३(५) मधील** एक सोन्याचे मंगळसुत्र, २३.८९ ग्रॅम वजनाचे, मध्यभागी दोन वाटया असलेले, अर्धवट तुटलेले, जुवाकिंसु

पुणे जिल्हा

३) **विश्रामबाग पो.स्टे., पुणे गुरनं १९९/२०२५ भारतीय न्याय संहिता क. ३०३ (२) मधील** मॅट ब्लॅक रंगाची एक यामाहा कंपनीची एफ झेड मॉडेलची मोटार सायकल नं. एमएच/२०/एफआर/१८५१, तिचा चेसीस नंबर MEIRG6618L0048573 इंजिन नंबर G3N3E0049132 असा असलेली, जुवाकिसु
४) **बिवेवाडी पोलीस ठाणे गु.र.नं. २१०/२०२५ भारतीय न्याय संहिता क. ३०९(४) ३(५)**
५) **हडपसर पोलीस ठाणे गु.र.नं. ३६१/२०२५ भारतीय न्याय संहिता क. ३०३(२)**
६) **हडपसर पोलीस ठाणे गु.र.नं. गु.र.नं. ७६३/२०२५ भारतीय न्याय संहिता क. ३०४(२) ३(५)**

उत्तर प्रदेश राज्य येथे दाखल असलेले गुन्हे

❖ तसेच अटक आरोपी **अभिषेक ओमप्रकाश जौहरी** याचे विरुध्द उत्तरप्रदेश येथे खालील गुन्हे दाख आहेत.

१) **हारगाव पोलीस ठाणे गु.रं.नं. २६६/२०१९ शस्त्र अधिनियम क. ३, २५ प्रमाणे**
२) **हारगाव पोलीस ठाणे गु.रं.नं. २६९/२०१९ भा.दं.वि.क. ४११,४१४,४२०,४६७,४६८ प्रमाणे**
३) **हारगाव पोलीस ठाणे गु.रं.नं. २६४/२०१९ भा.दं.वि.क. ३९, ४०२ प्रमाणे**
४) **कोतवाली पोलीस ठाणे गु.रं.नं. ५९६/२०१९ भा.दं.वि.क. ३९२, ४११ प्रमाणे**

तसेच आरोपी अर्पित ऊर्फ प्रशांत अवधेश शुक्ला याचे विरुध्द भा.दं.वि.कलम ३०२ प्रमाणे उत्तरप्रदेश मध्ये गुन्हा दाखल असल्याची माहिती मिळाली आहे.

वरील आरोपी यांची पोलीस कस्टडी मंजूर असून त्यांचे अधिक तपास पोलीस उप निरीक्षक प्रसाद चव्हाण करीत आहे.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त, श्री. अशितोष डुंबरे, मा. सह पोलीस आयुक्त, डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. संजय जाधव, पुर्व प्रादेशिक विभाग कल्याण, मा. पोलीस उप आयुक्त, सो परिमंडळ ३, कल्याण श्री. अतुल झेंडे,मा. सहा. पोलीस आयुक्त, श्री. सुहास हेमांडे, यांचे मार्गदर्शना खाली मा. वपोनि श्री. गणेश जवादवाड, मा. पोनि श्री. विक्रम गौड, मा. पोनि (गुन्हे) श्री.राजेद्र खेडकर डोंबीवली पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/अच्युत मुपडे, पोलीस उप निरी./प्रसाद चव्हाण, पो.हवा/१९२४ सुनिल भणगे, पो.हवा/७२१९ मंगेश शिर्के, पो.हवा/१३०७ प्रशांत सरनाईक, पोकॉ/३४०६ शिवाजी राठोड, पोकॉ/८४१३ नितीन सांगळे, पोकॉ/६१०२ राजेंद्र सोनवणे, पोकॉ/७६०६ देविदास पोटे, पोकॉ/२०२६ ज्ञानेश्वर शिंदे, यांनी केली आहे.